15-09-2024-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 9/14/2024 11:53 PM Page 1

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



गरज पडल्यास कुटबण 'सील' करणार पान ३ वर



भारतीय हॉकी संघ उपांत्य फेरीत पान ८ वर

वेर्णा, रविवार, १५ सप्टेंबर २०२४ | पाने ८ | ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 12 | Verna, | facebook.com/dainikherald Sunday 15 September, 2024 | Pages 8 | ₹ 4

**संपादकीय**

हरियाणात केजरीवाल फॅक्टर चालेल?

–पान ४

# राज्यात दोन अपघातांत ४ ठार

## मांद्रे अपघातात नणंद - भावजयचा जागीच मृत्यू, नानोडा अपघातात दोन युवक ठार

■ टीम दैनिक हेराल्ड :

**राज्यात अपघातांची मालिका सुरू असून शनिवारी सकाळी आस्कावाडा–मांद्रे पंचायतीजवळ दुचाकी, पिकअप रिक्षा व ट्रक यांच्यात झालेल्या भीषण अपघातात नणंद– भावजय जागीच ठार झाली असून एक मुलगी गंभीर जखमी झाली आहे. तिच्यावर बांबोळीतील गोवा मेडिकल कॉलेजमध्ये उपचार सुरू आहेत. सानिका सुभाष खर्बे (१९ वर्षे) आणि प्रियांका संदेश खर्बे (२९ वर्षे) अशी मृत झालेल्या नणंद– भावजयची नावे असून सिद्धी शेटकर ही गंभीर जखमी झाली आहे. दुसऱ्या घटनेत पेठवाडा नानोडा येथील व्हॅली मिडोज येथील वळणावर कार आणि दुचाकी यांच्या समोरासमोर झालेल्या भीषण अपघातात कानोळकरवाडा नानोडा येथील प्रतीक कानोळकर (२२) आणि वरचावाडा नानोडा येथील लक्ष्मण मळीक (१९) हे युवक जागीच ठार झाले.**

मिळालेल्या माहितीनुसार, सानिका, प्रियांका व सिद्धी या तिघी जीए ११ सी २०२९ क्रमाकांच्या स्कुटरवरून मांद्रे येथील मासळी मार्केटच्या दिशेने मासे आणायला गेल्या होत्या. त्यावेळी मासळी मार्केटपासून दोनशे मीटर अंतरावर एक पिकअप रिक्षा मांद्रे भागातून हरमल दिशेने जात होती. तर त्याचवेळी केए २२ डी ४८२२ क्रमांकाचा ट्रक मांद्रेतून आगरवाडा शिवोलीच्या दिशेने जात होता. यावेळी दुचाकीवरील युवतींनी रिक्षाला ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न केला असता रिक्षाच्या मागच्या बाजूला दुचाकीची धडक बसली आणि दुचाकीसह तिघी रस्त्यावर कोसळल्या. त्यावेळी विरुद्ध दिशेने येणाऱ्या ट्रकच्या चाकाखाली सानिका व प्रियांका आल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला.


तर दुचाकी चालविणारी सिद्धी ही गंभीर जखमी झाली. तिला तातडीने प्राथमिक उपाचारानंतर गोमेकॉत नेण्यात आले.

अपघात झाल्यानंतर ट्रक तसाच आगरवाडापर्यंत निघून गेल्यानंतर काही जमावाने तो ट्रक अडवला. एकाच अपघातात एकाच घरातील दोघेजणी जागीच ठार झाल्यामुळे आस्कावाडा परिसरात शोककळा पसरली आहे.

अपघात झाल्यानंतर मांद्रे पोलिस निरीक्षक शरीफ जॅकीस यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन पान २ ▶

### मासे आणायला जाताना काळाचा घाला

**सात दिवसांच्या गणपतीचे विसर्जन केल्यामुळे निदान आज तरी मासे खायला मिळतील या त्या तिघी दुचाकी घेऊन मासळी मार्केटकडे निघाली असता वाटेतच हा अपघात झाल्यामुळे हळहळ व्यक्त होत आहे.**



मृत प्रियांका खर्बे



मृत सानिका खर्बे





### आईविना दोन मुले पोरकी..

**सानिका ही आयटीआय करत होती, तर गंभीर जखमी झालेली सिद्धी ही उच्च माध्यमिक शिक्षण घेत होती. प्रियांका खर्बे ही गृहिणी होती. प्रियांका हिला दोन मुले आहे. प्रियांकाची सानिका ही नणंद होती. तर गंभीर जखमी झालेली सिद्धी ही प्रियांका हिची सख्खी बहीण आहे.**

## कार– दुचाकीचा नानोड्यात भीषण अपघात

पेठवाडा नानोडा येथील व्हॅली मिडोज येथील वळणावर कार आणि दुचाकी यांच्या समोरासमोर झालेल्या भीषण अपघातात कानोळकरवाडा नानोडा येथील प्रतीक कानोळकर (२२)आणि वरचावाडा नानोडा येथील लक्ष्मण मळीक (१९) हे दोन युवक जागीच ठार झाले, अशी माहिती डिचोली पोलिस ठाण्यातून देण्यात आली.

मारुती सीआयएझेड जीए ०४ ई ११२४ ही कार दोडामार्गहून म्हापसा या दिशेने जात होती तर जीए ०४ पी ५१२६ ही पल्सर दुचाकी अस्नोडाहून नानोडा या दिशेने जात असताना पेठवाडा नानोडा येथील व्हॅली मिडोज जवळच्या वळणावर हा अपघात झाला. हा अपघात एवढा भीषण होता की, दोन्ही गाड्यांचा चक्काचूर झाला. अपघात घडल्याची माहिती मागाहून येत असलेल्या डिचोली मतदारसंघाचे आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये यांच्या नजरेस पडला. पान २ ▶



अपघातग्रस्त वाहने.

## निवडक

### खाद्यतेल महागणार

**नवी दिल्ली, दि. १४ :** ऐन सणासुदीच्या काळात खाद्य तेल महागणार आहे. त्यामुळे आता सामान्य माणसाचं महिन्याचं बजेट कोलमडणार हे निश्चित झाले आहे. नवरात्रात नऊ दिवसांचे उपास असतात, दिवाळीत फराळ तयार केला जातो. या सगळ्यासाठी खाद्य तेल वापरले जाते. ऐन सणासुदीच्या काळात खाद्य तेलांच्या किंमती वाढल्याने ग्राहकांच्या खिशाला कात्री लागणार आहे तर गृहिणींचे महिन्याचे बजेट कोलमडणार आहे हे निश्चित. सरकारने क्रूड, रिफाईंड सनफ्लॉवर ऑईल आणि अन्य खाद्य तेलांवरील कस्टम ड्युटी वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. आयात शुल्कात २० टक्के वाढ करण्यात आल्याने खाद्य तेल महागणार आहे. ऐन सणासुदीत ही दरवाढ झाल्याने आता बजेट कसे मांडायचे हा प्रश्न सगळ्यांनाच सतावणार आहे. क्रुड आणि रिफाइंड पाम तेल, सोयाबीन तेल आणि सनफ्लॉवर सीड तेल यांवर बेसिक कस्टम ड्युटी वाढवण्यात आली आहे.

### जम्मूत ३ दहशतवाद्यांचा खात्मा

**जम्मू, दि. १४ :** जम्मू–काश्मीरच्या किश्तवाडमध्ये शुक्रवारी दहशतवाद्यांनी अचानक हल्ला केला. या हल्ल्याचा बदला भारतीय लष्कराने २४ तासांच्या आतच घेतला. बारामुल्ला येथे शोधमोहिम राबवून ३ दहशतवाद्यांचा खात्मा करण्यात आला. बारामुल्लाच्या टापर भागात भारतीय जवान आणि दहशतवाद्यांमध्ये अजूनही चकमक सुरू आहे. तेथे दोन दहशतवाद्यांना लष्कराने घेरले असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. लष्करी अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी सकाळी जम्मू–काश्मीरच्या कठुआमध्ये सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक झाली होती. खंडारा भागात लपून बसलेल्या ३ दहशतवाद्यांचा भारतीय लष्कराने खात्मा केला. यानंतर दुपारी साडेतीनच्या सुमारास लष्कराच्या जवानांनी किश्तवाडमध्ये आणखी एक कारवाई सुरू केली.

### आधार अपडेटच्या मुदतीत वाढ

**नवी दिल्ली, दि. १४ :** केंद्र सरकारने मोफत आधार अपडेट करण्याची मुदत तीन महिन्यांनी वाढवली आहे. याआधीही ती तीन महिन्यांसाठी मुदत वाढवण्यात आली होती. त्यानंतर आधार अपडेट करण्याची शेवटची तारीख आज १४ सप्टेंबर होती, मात्र सरकारने पुन्हा एकदा दिलासा दिला असून, याचा फायदा देशातील कोट्यवधी लोकांना होणार आहे.

यूआयडीआयने दिलेल्या माहितीनुसार, १० वर्षांपेक्षा जुने सर्व आधार अपडेट करणे अनिवार्य करण्यात आले आहे. जर तुमच्याकडे १० वर्षांपेक्षा जुने आधार कार्ड असेल तर तुम्हाला ते अपडेट करावे लागेल, असेदेखील भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणने सांगितले आहे. भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाने त्यांच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म द वर एका पोस्टमध्ये म्हटले आहे की, णखउ्ख ने मोफत ऑनलाइन दस्तऐवज अपलोड करण्याची सुविधा १४ डिसेंबरपासून पुन्हा वाढवण्यात आली आहे.

# कॅन्सरच्या प्रमाणाबाबत मुख्यमंत्र्यांना चिंता

■ *टीम दैनिक हेराल्ड*



**▶ वर्षभरात सर्व गावात मोबाईल व्हॅनद्वारे कॅन्सरची पूर्वतपासणी अभियान राबविणार**

**डिचोली, दि. १४ :** कॅन्सरसारखा रोग राज्यात बळावत असून चालू स्थितीतील आकडेवारी चिंता करणारी आहे. मात्र, आता वर्षभरात संपूर्ण गोव्यात मोबाईल व्हॅनद्वारे लोकांची कॅन्सर पूर्व तपासणी करणार आहे. या मोहिमेला लोकांनी सहकार्य करावे, असे आवाहन मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी साखळी येथे केले. तसेच एरव्ही कोणत्याही बाबतीत गोमंतकीयांना भिवपाची गरज ना, असे सांगणारे मुख्यमंत्री डॉ. सावंत यांनी कॅन्सरबाबत आता भिवपाची गरज आसा, असे म्हटले आहे.

राज्यातील वाळपई, कुडचडे, मंडूर या भागात हल्लीच सुमारे ५१८ लोकांची पूर्वचाचणी करण्यात आली, त्यावेळी पान २ ▶

# गोवा काँग्रेसची नामी शक्कल !

**▶ ८ फुटीर आमदारांचा दुसरा पक्षांतर वर्धापनदिन केला साजरा**

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**मडगाव, दि. १४ :** काँग्रेसच्या ८ फुटीर आमदारांची गद्दारी लोकांनी विसरू नये म्हणून काँग्रेसने शनिवारी नामी शक्कल लढवली. या आठ फुटीर आमदारांच्या पक्षत्यागाच्या दुसऱ्या वर्धापनदिनानिमित्त काँग्रेस पक्षाने आगामी विधानसभा निवडणुकीत या माजी सदस्यांचा पराभव करण्याची शपथ घेतली. पक्षाने शनिवारी जाहीर केले की, पक्षांतर केलेल्या एकाही आमदाराला निवडणुकीसाठी तिकीट मिळणार नाही. लोहिया मैदानावरील काँग्रेसच्या रॅलीत पक्षाचे नेते आणि समर्थकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. या सर्वांनी आमदारांच्या भाजपात जाण्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. तसेच या आठ आमदारांच्या प्रतिमांचेही दहन करण्यात आले.



काँग्रेसने मडगावचे आमदार दिगंबर कामत यांच्यावर पक्षांतराचा मास्टरमाईंड असल्याचा आरोप करत आमदारांना भाजपमध्ये हलवण्यामागे त्यांचा हात असल्याचा आरोप केला आहे. हे आठही पक्षांतरित आमदार गोव्यातील जमीन विक्री, पर्यावरणाचा ऱ्हास आणि भ्रष्टाचार यासह विविध हानिकारक कारस्थानात गुंतले असून त्यांचे या क्षेत्रातील माफियांशी व्यापक संबंध असल्याचा आरोप काँग्रेसने केला.

दक्षिण गोव्याचे खासदार कॅप्टन विरियातो फर्नांडिस यांनी आगामी विधानसभा निवडणुकीत आमदार दिगंबर कामत यांना पराभूत करण्याचे आवाहन मडगावच्या जनतेला केले. पक्षांतरातील कथित भूमिकेसाठी कामत यांना जबाबदार धरण्याच्या गरजेवर त्यांनी भर दिला. कामत हे पक्षांतराचे सूत्रधार आहेत. इतरांसोबत त्यांनी केवळ काँग्रेस पक्षाचाच नव्हे तर जनतेचा आणि देवाचाही विश्वासघात केला आहे, असा आरोप फर्नांडिस यांनी केला. अशा व्यक्तींना सत्तेची पदे भूषवण्याची परवानगी दिली जाऊ नये, असेही ते पुढे म्हणाले.

विरोधी पक्षनेते युरी आलेमाव यांनी पक्षांतरित आमदारांनी त्यांच्या शपथेचे पालन न केल्याची टीका केली. पान २ ▶

# कर्नाटकच्या मासेमारी बोटींचा थरारक पाठलाग

## गोव्याच्या पारंपरिक मच्छीमारांचा जीवघेणा संघर्ष





■ *टीम दैनिक हेराल्ड*

**वेळसाव, दि. १४ :** कर्नाटकच्या मालपे मधून येऊन गोव्याच्या हद्दीत घुसून वेळसांव किनाऱ्यालगत बेकायदेशीर मासेमारी करणाऱ्या मोठ्या बोटींचा पारंपरिक मच्छीमारांनी आपल्या छोट्या होड्यांनी भरसमुद्रात पाठलाग केल्याचा थरारक व्हिडिओ सध्या सर्वत्र व्हायरल होतोय. ही घटना शुक्रवारी पहाटे घडली. मत्स्यव्यवसाय खात्याकडे गस्ती नौका नसल्याने पारंपरिक मच्छीमारांना, आपला जीव धोक्यात घालून, गोव्याच्या समुद्राच्या हद्दीत घुसलेल्या आणि किनाऱ्यापासून तीन ते चार किलोमीटरच्या आत कार्यरत असलेल्या कर्नाटकच्या ट्रॉलर्सना हाकलून देण्याचा प्रयत्न करावा लागला.

पाठलाग करताना दुसऱ्या डोंगीतून काढलेल्या या व्हिडओमध्ये अगदी किनाऱ्याजवळ मासेमारी करणाऱ्या कर्नाटकच्या बोटीचा पाच ते सहा पारंपरिक मच्छीमार जिवाच्या आकांताने पाठलाग करत त्या बोटीला पिटाळून लावताना दिसत आहेत. हा प्रकार नेहमीच सुरू असून सरकार याबाबत काहीही करीत नसल्याची खंत व्हिडिओ करणाऱ्या पारंपरिक मच्छीमाराने व्यक्त केली आहे. व्हिडिओमध्ये माशांचे दुर्भिक्ष आणि गोव्यातील मच्छीमारांवर होणारे व्यापक परिणाम यावरही प्रकाश टाकण्यात आला आहे.

व्हिडिओमध्ये आठ कर्नाटकचे ट्रॉलर वेळसांव किनाऱ्याजवळ दिसत आहेत. वेळसांवच्या उत्तरेला सात ट्रॉलर नांगरून ठेवलेले दिसत आहेत, एक लाल, नोंदणीकृत नसलेल्या अनधिकृत मालपे ट्रॉलरचा पाठलाग सुमारे पाच पारंपरिक होड्या करत आहेत. स्थानिक मच्छीमार तोंड देत असलेल्या या भीषण परिस्थितीचे वर्णन व्हिडिओत ऐकू येते आहे.

मालपेच्या या ट्रॉलर्सनी आमची जाळी उद्‌ध्वस्त केली आहेत आणि आमचे मच्छीमार पाठलाग करत आहेत. आम्ही गोवा सरकारला मदतीसाठी आवाहन करतो. आमची रोजीरोटी धोक्यात आली आहे, आणि सरकार आम्हाला मदत करत नाही, असे या व्हिडिओ करणाऱ्या पारंपरिक मच्छीमाराने म्हटले आहे.

पारंपरिक मच्छीमारांच्या होड्यांना मोठ्या ट्रॉलरएवढे शक्तिशाली इंजीन नसते म्हणून या ट्रॉलरचा पाठलाग करण्यासाठी त्यांना दोन – दोन इंजीन लावावी लागतात. याउलट या मोठया ट्रॉलरचे इंजीन तर शक्तिशाली असतेच, शिवाय या ट्रॉलरवरच्या कर्मचाऱ्यांकडे आधुनिक शस्त्रास्त्रे देखील असतात. त्यामुळे पारंपरिक मच्छीमारांच्या जिवाला मोठा धोका असतो. याआधीही मच्छीमारांमध्ये मारामारी होऊन ते जखमी झाले आहेत. शिवाय याआधी काही मालपेच्या बोटींनी कोस्टल पोलिसांवर देखील दगडफेक केल्याच्या घटना घडल्या आहेत.

गोव्याच्या १२० किमी किनारपट्टीवर नऊ किनारी पोलिस स्टेशन्स असूनही, एकही प्रभावी इंटरसेप्टर बोट नाही. तटरक्षक दल आणि मुरगाव बंदर प्राधिकरणाकडे या समस्येचे निराकरण करण्यास सक्षम जहाजे आहेत, परंतु त्यांनी अद्याप ठोस कारवाई केलेली नाही. अलीकडेच गोव्यातील मुंबई उच्च न्यायालयाने तटरक्षक दलावर अपुऱ्या किनारपट्टी संरक्षणासाठी टीका केली आणि सहा महिन्यांत सुधारणा करणे अनिवार्य केले आहे.

> **"हे ट्रॉलर संपूर्ण गोव्यात, दक्षिणेकडून उत्तरेकडील कांदोळी, शापोरा, केरीपर्यंतचा माशांचा साठा कमी करत आहेत. शापोरा कोस्टल पोलिस स्टेशनमध्ये एकच बोट आहे जी खराब हवामानात दोन नॉटिकल मैलांच्या पलीकडे काम करण्यास असमर्थ आहे. शापोरा ते वेळसांवपर्यंतच्या मच्छीमारांना किनारी पोलिस मदत करू शकत नाहीत. माशांच्या किमती वाढत आहेत आणि मच्छीमारांना धोका वाढतो आहे आणि सरकार हाताची घडी घालून आहे.**
> **- ओलंन्सिओ सिमोईस, ( गोंयच्या रापोणकरांचो एकवोट )**

**हवामान**

कमाल : ३० किमान : २४
आर्द्रता : ८९

**बाजार भाव**

सोने : ₹ ६९,७३० (१० ग्रॅम)
चांदी : ₹ ८१,३०० (१ किलो)

**शेअर मार्केट**

सेन्सेक्स : ७९,७०५.९१ ↑ (८१९.६९)
निफ्टी : २४,३६७.५० ↑ (२५०.५० )